## प्रेसनोट

दि. २७/१२/२०२४

### ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून सजा बाणेर,पुणे येथील तलाठयासह खाजगी इसम याना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बाणेर पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४२ वर्ष |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) उमेश विठ्ठल देवघडे, वय ३९ वर्ष,पद- तलाठी,बाणेर सजा कार्यालय,बाणेर,पुणे.(वर्ग-३)<br>२) श्री. काळुराम ज्ञानदेव मारणे, वय ३९ वर्ष, व्यवसाय – नोकरी, रा. स.नं. १३०, दांडेकर पुल, सिंहगड रोड, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये लाच मागणी |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | १०,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- (दहा हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. २३/१२/२०२४ व दि. २७/१२/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. २७/१२/२०२४ |
| ठिकाण | बाणेर तलाठी कार्यालयासमोरील आवारामध्ये, बाणेर, पुणे. |
| तपास अधिकारी | श्रीमती. नीता मिसाळ, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि. पुणे. (मो.क्र. ९८२२२१४४१४) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे वडीलांनी मृत्युपत्राद्वारे त्यांची बाणेर येथील असलेली जमीन मिळकत ही तक्रारदार यांच्या पत्नीचे नावे करण्याबाबत नोंदणीकृत मृत्युपत्र केले होते.

तक्रारदार यांचे वडील दि. २९/८/२०२४ रोजी मयत झाले. त्याप्रमाणे वडीलांचे मृत्युपत्रानुसार त्यांचे नावे असलेली जमीन मिळकतीवर वारस नोंद करण्यासाठी तक्रारदार यांच्या पत्नीने आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज तलाठी कार्यालय पाषाण, पुणे येथे सादर केला असून, त्याचा पाठपुरावा तक्रारदार करत होते. सदरचा अर्ज सजा बाणेर येथील तलाठी लोकसेवक उमेश देवघडे यांचेकडे प्रलंबित होता.

तक्रारदार हे दि. १८/१२/२०२४ रोजी बाणेर तलाठी कार्यालयात पत्नीच्या वारस नोंदीच्या अर्जाबाबत चौकशीसाठी लोकसेवक उमेश देवघडे यांना भेटले असता, वारस म्हणून पत्नीचे नाव लावणेसाठी प्रथम २०,०००/- रुपये लाच रक्कम मागितली. त्यावेळी तक्रारदार यांनी 'एवढे पैसे नाही, थोडे कमी करा' असे बोलल्यावर लोकसेवक उमेश देवघडे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीने १०,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक उमेश देवघडे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील नमुद काम करणेकरीता पंचासमक्ष १०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, खाजगी इसम काळुराम मारणे यांनी लोकसेवक उमेश देवघडे यांचे सांगणेवरुन तक्रारदार यांचेकडून रुपये १०,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यावेळी आरोपी लोकसेवक उमेश देवघडे यांचे ताब्यातील KIA SELTOS कार क्रमांक MH 16 / CV / 8200 ची तपासणी केली असता, कारमध्ये ३,००,०००/- रुपये रोख मिळून आली.

त्या दोघांविरुद्ध बाणेर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पोलीस आयुक्त /पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो पुणे

Scanned with CamScanner